दुरध्वनी क्र.: 02528-222337
ईमेल : dahanudcf@gmail.com
dycfdahanu@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
वन विभाग

**उप वनसंरक्षक डहाणू वनविभाग, डहाणू यांचे कार्यालय**
**डहाणू आगर रोड, पारनाका, पंचायतसमिती, डहाणू कार्यालयाशेजारी**
**ता. डहाणू, जि-पालघर, महाराष्ट्र 401 601.**

पत्र जा.क्र.अ/२०/जमिन/ 1365 /सन २०२३-२०२४ दिनांक 05 डिसेंबर, २०२३

**प्रति,**

मुख्य वनसंरक्षक, (प्रा)
ठाणे.

**विषय** :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ५४७८२

**संदर्भ** :-१. आपलेकडील पत्र जा.क्र.कक्ष-१०/वसं/२२-२३/५१, दिनांक २६.०४.२०२३.
२. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अ/२०/जमिन/०३/सन २०२२-२३, दिनांक २६.०४.२०२३.
३. आपलेकडील पत्र जा.क्र.कक्ष-१०/वसं/२२-२३/४९२, दिनांक ०६.१२.२०२३.

विधानसभा सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) यांनी उपस्थित केलेला राज्यातील वनविभागाच्या हददीतील पाझर तलाव दुरूस्तीबाबत अतारांकित प्रश्न क्रमांक ५४७८२ ची सादर करण्यांत आलेली माहिती पुनश्चः खात्री करुन पाठविणेबाबत संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये कळविले आहे.

प्रस्तुत प्रश्नाचे अनुषंगाने डहाणू वनविभागाच्या हददीमध्ये डोंगर माथ्यावर जमिनीतील जलस्त्रोत वाढविण्याकरीता पाझर तलावाची निर्मिती करण्यांत आलेली नसून त्याचे दुरूस्तीकरीता प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. सबब सदर अतारांकित प्रश्न क्र. ५४७८२ करीताचे या कार्यालयाकडील संदर्भीय क्रमांक २ अन्वये सादर करण्यांत आलेले विहीत नमुन्यातील उत्तर पुनश्चः यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

( मधुमिथा एस. )
उप वनसंरक्षक,
डहाणू वनविभाग, डहाणू

राज्यात वन विभागाच्या हददीतील पाझर तलाव दुरूस्तीकरीता अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.५४७८२.

| अ. | विचारलेला प्रश्न | वस्तुस्थिती | सुचित उत्तर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | वन विभागाच्या हददीमध्ये डोंगर माथ्यावर जमिनीतील जलस्त्रोत वाढविण्याकरीता पाझर तलावाची निर्मिती करण्यांत आली असून त्यांच्या दुरूस्तीकरीता वनविभागाची परवानगी आवश्यक आहे, हे खरे आहे काय? | हे खरे नाही,<br>डहाणू वनविभागाच्या हददीमध्ये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाकडून वळतेकरण झालेल्या पाझर तलावाच्या दुरूस्तीसाठी प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. | रकाना क्र.३ प्रमाणे |
| २. | तसेच जमिनीतील वनविभागाच्या हददीतील पाझर तलाव दुरूस्तीकरीता वन विभागाची दुरूस्ती मान्यता मिळण्यामध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय, | वरीलप्रमाणे. | रकाना क्र.३ प्रमाणे |
| ३ | असल्यास, याबाबत पाझर तलाव दुरूस्तीकरीता अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे, | या कार्यालयास ज्ञात नाही. | रकाना क्र.३ प्रमाणे |
| ४ | नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत? | वरीलप्रमाणे. | रकाना क्र.३ प्रमाणे |

उप वनसंरक्षक
डहाणू वनविभाग, डहाणू.